वाचले-

१) माध्य/शि/०४/कावि/६७१/२०१७ दि.१७/१०/२०१७
२) मावि/खराळवाडी/०१/कावि/१७२/२०१८ दि.३१/०८/२०१८
३) मा.वि.खराळवाडी यांचे दि. १७/१०/२०१८ चे प्रशासन विभागास पत्र
४) माध्य/शि/०१/कावि/११९६/२०१८ दि.२७/१२/२०१८
५) मा.वि.खराळवाडी यांचे दि.०४/०१/२०१९ चे पत्र
६) माध्य/शि/०१/कावि/२०/२१/२२/२०१९ चे ज्ञापन
७) श्री.गेंगजे चंद्रशेखर शांताराम (लिपिक) यांचा दि.११/०१/२०१९ चा खुलासा
८) मुख्याध्यापिका मा.वि.खराळवाडी यांचा दि.२१/०१/२०१९ चा खुलासा
९) मा.शिक्षणाधिकारी यांचा दि. 3 /०५/२०१९ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/१/कावि/ 240 /२०१९
दिनांक -03/०५/२०१९

विषय – सक्त ताकीद देणेबाबत....
श्री.गेंगजे चंद्रशेखर शांताराम (लिपिक) मा.वि.खराळवाडी

आदेश

मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांचेकडील वाचले क्र.०१ च्या आदेशान्वये माध्यमिक शिक्षण विभागाकडील माध्यमिक शिक्षकांना चट्टोपाध्याय आयोगानुसार १२ वर्षाचा लाभ देणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. वाचले क्र.०२ अन्वये श्री.गांजुरे (सहा.शिक्षक) यांची १२ वर्षाची वेतन निश्चिती करणेत आलेली होती. सदर वेतन निश्चीती आदेशामध्ये दि.०१/०७/२०१८ चे मुळ वेतन बरोबर दिलेले होते.परंतु १२ वर्ष द्यावयाचा दि.०१/०९/२०१३ हा चुकीचा नमुद करणेत आलेला होता.मा.वि.खराळवाडी विद्यालयाने वाचले क्र.०३ अन्वये प्रशासन विभागास श्री.गांजुरे यांचे मुळवेतना मध्ये बदल करणेबाबत पत्र देण्यात आले, यामध्ये मुळ वेतन रक्कम रू. १७,६००/- एवजी १८,३६०/- असे चुकीचे करणेत आले होते.

वाचले क्र. ०४ अन्वये माध्यमिक शिक्षण विभागाने मा.वि.खराळवाडीच्या मुख्याध्यापिका यांना संबधीत शिक्षक श्री.गांजुरे यांच्या १२ वर्षाच्या लाभ देणेबाबत वेतननिश्चिती संदर्भात विचारणा केलेली होती. वाचले क्र.०५ अन्वये मुख्याध्यापिका यांच्या खुलाश्यावरून वेतननिश्चिती व चुकीचे मुळवेतन संगणकावर टाकणे बाबत विद्यालयामार्फत पत्र दिलेले होते.सदर पत्र श्री.गेंगजे यांनी प्रशासन विभागात जाउन मुळ वेतन बदल करणेबाबत पत्र दिलेले आहे. सदर बाब श्री.गेंगजे यांच्याकडुन नजर चुकीने झालेली आहे, असे श्री.गेंगजे यांच्या खुलाश्यावरून दिसुन येतआहे.सदर बाब आर्थीक दृष्ट्या अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. तरी याबाबत श्री.गेंगजे यांचा दि.११/०१/२०१९ चा खुलासा मान्य करणेत येत असुन,याबाबत श्री.गेंगजे (लिपिक) यांना एकवेळ संधी म्हणुन सक्त ताकीद देणेत येत आहे.

सबब मी शिक्षणाधिकारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी -१८ या आदेशान्वये श्री.गेंगजे चंद्रशेखर शांताराम (लिपिक) यांना सक्त ताकीद देणेत येते की श्री.गेंगजे यांनी भविष्यात आर्थीक व इतर कोणत्याही बाबतीत अशा प्रकारे कामकाजात चुका केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका कलम ५६ (ड) अन्वये यापुढील कारवाई करणेत येईल याची त्यांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

Scanned by CamScanner